कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम (पूर्व) विभाग,पुणे १
बी बरॅक, मध्यवर्ती इमारत परिसर,कॅम्प, पुणे-४११००१

Email-eastpune.ee@mahapwd.com Phone : ०२०-२६१२२४५७

जा.क्र.सा.बां.वि.पू/प्रशा-३/हा.अॅ./पी.एन-१६३/------/२०२१ ६७६५ दिनांक०२ /०७/२०२१

प्रति,

मा. उपवनसंरक्षक,
घोड प्रकल्प वनविभाग जुन्नर-४१० ५०२

आवक / जावक लिपिक
उप वनसंरक्षक कार्यालय
घोड प्रकल्प वनविभाग
तहसिल कार्यालयाजवळ
जुन्नर, जि. पुणे.४१०५०२
4/8/2021

**विषय :** वन (संवर्धन) अधिनियम,१९८० अंतर्गत कलम २ प्रमाणे सन १९८० पुर्वी अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या रुंदीकरणासाठी वनक्षेत्र ०.५३१ हेक्टर मिळणे बाबत.
(पुणे-शिरुर-अहमदनगर रस्ता राज्य महामार्ग क्र.०५ कि.मी. १०/६०० ते कि.मी ३६/६०० पी.एन.१६३ जि. पुणे.) ***Proposal No.:-FP/MH/ROAD/142578/2021.***

**संदर्भ:** १.शासन निर्णय क्रमांक पिएलएन-२०१६/सीआर-(२५२७)/ नि-३ मंत्रालय, मुंबई दिनांक १/१२/२०१६. सुधारित क्र. HAM-SPV-२०१८ / C.R.-१३०-A / Road-५, दिनांक ४/०९/२०१८.
२.महाराष्ट्र शासनाच्या वनविभागाकडील महापरिवेश या वेबसाईटवर दिनांक २५/०५/२०२१ रोजी Online सादर Form-A-Part-I प्रपत्र.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी संदर्भ क्र.१ नुसार शासनाने पुणे जिल्हयातील **रस्त्यांची सुधारणा करणेसाठी हायब्रीड अॅन्यूटी (Hybrid Annuity Mode)** कार्यक्रमांतर्गत रस्ते दुरुस्तीसाठी निर्णय पारित केलेला आहे. सदर प्रकल्प हा शासनाचा महत्त्वकांशी प्रकल्प आहे.

पुणे जिल्हयातील **रस्त्यांची सुधारणा करणे** या मध्ये पुणे- शिरुर-अहमदनगर राज्य महामार्ग-क्र.०५ या रस्त्याचा समावेश आहे. प्रकरणातील पुणे- शिरुर अहमदनगर रस्ता वनविभागाच्या टोपोशिट क्र. 47-J-2 (Surveyed year 1974-75) तसेच टोपोशिट क्र. 232 N.W./1&3E (Surveyed year 1895-96) वर नमुद असुन सन १९८० पुर्वी अस्तित्वात असलेला रस्ता आहे. प्रस्तुत रस्ता हा पुणे जिल्हयातुन-शिरुर-अहमदनगर जिल्हयाकडे व पुढे जाणारा महत्वाचा रस्ता असुन या रस्त्यावर वर्षभर मोठया प्रमाणावर वाहतूक असते. प्रकरणी टोपोशिट वरील बाब लक्षात घेता सदर रस्ता साधारणत: १३२ वर्ष वा त्या पेक्षाही जुना रस्ता आहे.

प्रस्तुत सन १९८० पुर्वी वनक्षेत्रात अस्तित्वात असलेला पुणे- शिरुर-अहमदनगर राज्य महामार्ग-क्र.०५ रस्ता साखळी क्रमांक ***LHS-29+0.50 to 29+480 & RHS-29+020 to 29+490*** या लांबी मध्ये (४५० मी. X ११.८० मीटर=५३१० मी. एकुण ०.५३१ हे.) वन विभागाच्या क्षेत्रातुन जातो. सदर रस्ता मौजे कोरेगांवभिमा ता.शिरुर जि पुणे या गावाच्या वन कंपार्टमेंट ३०३ गट नं.६७३, ६७४ व ६७८ मधुन जातो. प्रकरणी चार पदरी असलेला हा संपुर्ण रस्ता सहा पदरी करणेचे काम प्रगती पथावर आहे. यास्तव वनक्षेत्र असलेल्या ठिकाणी सुध्दा रस्ता रुंद करणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी ०.५३१ हेक्टर वनक्षेत्राची आवश्यकता आहे.

प्रकरणी या रस्त्याच्या रुंदीकरणासाठी आवश्यक असलेले वनक्षेत्र मिळणेसाठी वनविभागाची मंजूरी मिळण्या करीता वन (संवर्धन) अधिनियम,१९८० अंतर्गत कलम २ प्रमाणे, विहीत प्रपत्र Form-A-Part-I वनविभागाकडील महापरिवेश या वेबसाईटवर दिनांक २५/५/२०२१ रोजी Online सादर करण्यात आले आहे. त्यानुसार सदर प्रस्तावास अनुक्रमांक ***Proposal No.:-FP/MH/ROAD/142578/***

**2021** मिळाला असुन वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वनविभागास प्रस्ताव सादर करण्या बाबत Online सुचना प्राप्त आहे.

वनविभागाकडील महापरिवेश या वेबसाईटवर Online सादर करण्यात आलेल्या प्रपत्र **Form-A-Part-I** नुसार प्रस्ताव सादर करण्यास मिळालेल्या अनुमती प्रमाणे, वन (संवर्धन) अधिनियम,१९८० अंतर्गत विहित नमुन्यातील ७ प्रतितील प्रस्ताव केएमएल सीडी-३ सह या सोबत सादर करण्यात आला आहे. तरी प्रकरणी शासनाकडील मंजूरीच्या अनुषंगाने आपणाकडील आवश्यक कार्यवाही होणेस विनंती आहे.

**सोबत**-वरील प्रमाणे (७ प्रती)

उज्वला सं. घावटे
सहाय्यक अभियंता श्रेणी-१
सा. बां. प्रकल्प (खाजगीकरण)
उपविभाग, पुणे-१

O/C

(मिलींद श्री.बारभाई)
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम (पूर्व) विभाग, पुणे

**प्रत:-** सहायक अभियंता, श्रेणी-१ सार्वजनिक बांधकाम (खाजगीकरण) उप विभाग पुणे, बी बरॅक, मध्यवर्ती इमारत परिसर, कॅम्प, पुणे-४११००१. यांना माहिती व कार्यवाहीसाठी रवाना.